शुक्रवार दि. ४ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना औद्योगिक विकासाच्या नव्या पर्वाच्या उंबरठ्यावर

# औद्योगिक शिखर परिषदेत २ हजार कोटींच्या गुंतवणुकीची घोषणा

## ड्राय पोर्ट, ऑटो उद्योग, कृषी-प्रक्रिया व MSME क्षेत्राला मोठ्या संधी













**जालना - प्रतिनिधी**

औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने विकसित होणाऱ्या जालना जिल्ह्याच्या औद्योगिक भविष्यास नवी दिशा देणारी पहिली ‘जालना विकासाचे प्रवेशद्वार’ औद्योगिक शिखर परिषद गुरुवारी उत्साहात पार पडली. जालना फर्स्ट सिटिझन फोरमने विकास ग्रुपच्या सहकार्याने तसेच जिल्हा प्रशासनाच्या पाठिंब्याने आयोजित केलेल्या या परिषदेत उद्योजक, गुंतवणूकदार, बँकर्स, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, लॉजिस्टिक्स कंपन्या, व्यापार संघटना आणि शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी अशा ४५० हून अधिक मान्यवरांनी सहभाग घेतला. जालना जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचे पुढील पर्व मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क () अर्थात ड्राय पोर्ट केंद्रस्थानी ठेवून घडविण्याचा निर्धार या परिषदेत व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे, परिषदेत लॉयड्स मेटल्सने नजीकच्या काळात २ हजार कोटी रुपये आणि दीर्घकालीन ६ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची वचनबद्धता व्यक्त केल्याने जालना जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्रासाठी ही परिषद अत्यंत महत्त्वाची ठरली.

**मोठ्या उद्योगांची उपस्थिती; गुंतवणुकीसाठी जालन्याकडे लक्ष**

परिषदेला टोयोटा, एंड्यूरन्स टेक्नॉलॉजीज, एल.जी.बी., बजाज, गरवारे, सेंट-गोबेन, लॉयड्स मेटल्स, महिको यांसारख्या प्रमुख औद्योगिक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थिती लावली. त्याचबरोबर जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (), , भारतीय रेल्वे, , इंडियन ऑयल कॉर्पोरेशन तसेच प्रमुख बँकांचे प्रतिनिधीही परिषदेत सहभागी झाले. यामुळे जालना जिल्ह्यातील औद्योगिक क्षमता, उपलब्ध पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स व्यवस्था, गुंतवणुकीच्या संधी आणि प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांवर उद्योग क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींमध्ये थेट चर्चा झाली.

**लॉयड्स मेटल्सची मोठी गुंतवणूक वचनबद्धता**

परिषदेतील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने जालना परिसरात नजीकच्या काळात २ हजार कोटी रुपये आणि दीर्घकालीन ६ हजार कोटी रुपयांपर्यंत गुंतवणुकीची वचनबद्धता व्यक्त केली.

या गुंतवणुकीमुळे जालना जिल्ह्याच्या औद्योगिक विस्ताराला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. मोठ्या उद्योगांच्या गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीबरोबरच लघु व मध्यम उद्योग, पूरक उद्योग, सेवा क्षेत्र आणि पुरवठा साखळीतील व्यवसायांनाही संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.

**इंडियन ऑयलकडून स्थानिक उद्योगांशी सामंजस्य करार**

स्थानिक उद्योगांच्या दृष्टीनेही परिषदेत महत्त्वपूर्ण घडामोड झाली. इंडियन ऑयल कॉर्पोरेशनने विनोदराय इंजिनियरिंग आणि रूट पाइप्स यांच्यासोबत गॅस पुरवठ्यासंदर्भात सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

यामुळे जालना जिल्ह्यातील औद्योगिक उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक ऊर्जा पायाभूत सुविधांना बळ मिळण्याची शक्यता आहे. स्थानिक उद्योगांना नियमित आणि विश्वासार्ह गॅस पुरवठा उपलब्ध झाल्यास उत्पादन खर्च, कार्यक्षमता आणि विस्ताराच्या दृष्टीने सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

एंड्यूरन्स, बजाजकडून स्थानिक व्हेंडर विकसित करण्यास स्वारस्य

ऑटोमोबाईल आणि ऑटो-कॉम्पोनंट क्षेत्रासाठी जालना जिल्ह्यात मोठ्या संधी असल्याचेही परिषदेत स्पष्ट झाले. एंड्यूरन्स टेक्नॉलॉजीज आणि बजाजसह अनेक मूळ उपकरण उत्पादक कंपन्यांनी जालन्यात तातडीने स्थानिक व्हेंडर विकसित करण्यास स्वारस्य दाखविले.

यामुळे स्थानिक उद्योजक, आणि पूरक उद्योगांना मोठ्या कंपन्यांच्या पुरवठा साखळीत सहभागी होण्याची संधी मिळू शकते. स्थानिक पातळीवर उद्योगांची संख्या वाढण्याबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळण्याची शक्यता आहे.

**ड्राय पोर्ट ठरणार जालन्याच्या विकासाचा केंद्रबिंदू**

परिषदेतील चर्चेचा प्रमुख विषय मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क आणि जालना ड्राय पोर्ट हा होता. जालना हे मराठवाड्याच्या मध्यवर्ती भागात असल्याने रेल्वे, रस्ते आणि राष्ट्रीय बंदरांशी जोडणीच्या माध्यमातून जिल्ह्याला गेटवे म्हणून विकसित करण्याची क्षमता असल्याचे विविध वक्त्यांनी अधोरेखित केले.

चे अध्यक्ष गौरव दयाल यांनी जालन्याच्या राष्ट्रीय बंदर जाळ्याशी असलेल्या संभाव्य संपर्कावर प्रकाश टाकला. ड्राय पोर्टच्या माध्यमातून मराठवाड्यातील उद्योगांना निर्यात-आयातीसाठी अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्स (पान २ वर)

### चार प्रमुख मागण्यांचा पुनरुच्चार

**जालना फर्स्ट सिटिझन फोरमने जिल्ह्याच्या औद्योगिक व नागरी विकासाला गती देण्यासाठी शासनाकडे यापूर्वी मांडलेल्या चार प्रमुख मागण्यांचा परिषदेत पुन्हा उच्चार केला. यामध्ये ड्राय पोर्टला शेंद्रा-बिडकीन मार्गिकेशी जोडणारा रस्ता, जालना-छत्रपती संभाजीनगर शटल रेल्वे, नवीन टप्प्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे, तसेच च्या नेतृत्वाखाली नियोजित नागरी विकास या मागण्यांचा समावेश आहे.**

---

**गॅझेट, सातारा-कोल्हापूर जीआर, प्रलंबित प्रमाणपत्रे, अन् ३५० पीएसआय नियुक्त्यांवर जरांगे पाटील ठाम**

# ‘हे सगळं झालं तरच उठतो!’



**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणावर असलेले मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी सकाळी सरकारवर जोरदार निशाणा साधत आपल्या मागण्यांवर ठाम भूमिका मांडली. ‘‘सगळं झाल्याशिवाय उपोषण सुटणार नाही’’, असा स्पष्ट इशारा देत त्यांनी हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी, सातारा आणि कोल्हापूर संस्थानचा जीआर, प्रलंबित प्रमाणपत्रांची प्रकरणे, आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे तसेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा कालावधी वाढत असताना त्यांच्या भूमिकेत कोणतीही माघार नसल्याचे त्यांच्या आजच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे. मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकारला त्यांनी थेट मुदत देत ‘‘दोन दिवसांत काम झालं नाही तर सलाईन काढून फेकतो; पण उपोषण सुटणार नाही,’’ असा इशारा दिला.

**‘‘बिन जीआरच उपोषण थांबवणार नाही’’**

मराठा आरक्षणाच्या मागणीवर सरकारने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा, अशी जरांगे पाटील यांची भूमिका आहे. विशेषतः हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी तातडीने शासन निर्णय अर्थात जीआर काढण्यात यावा आणि त्याची अंमलबजावणी निश्चित कालमर्यादेत करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

‘‘जीआर काढल्याशिवाय उपोषण सोडणार नाही,’’ असा ठाम पवित्रा त्यांनी घेतला आहे. गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी जीआर काढून पुढील तीन महिन्यांत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणीही त्यांनी सरकारसमोर ठेवली.

**सातारा-कोल्हापूर संस्थानच्या जीआरची मागणी**

हैदराबाद गॅझेटसोबतच सातारा आणि कोल्हापूर संस्थानचा जीआर काढण्याची मागणीही जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा जोरदारपणे मांडली. या दोन्ही मागण्यांवर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे.

‘‘सातारा-कोल्हापूर संस्थानचा जीआर काढा; त्याशिवाय मी ऐकणार नाही,’’ अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे सरकार आणि जरांगे यांच्यातील चर्चेत या मुद्द्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

‘‘सरकारी दस्तावेज मान्य नसतील तर इतिहासही मान्य करू नका’’

सरकारी दस्तावेजांच्या आधारे मराठा समाजाच्या मागण्यांबाबत प्रश्न उपस्थित केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली.

‘‘सरकारी दस्तावेज मान्य नसतील तर स्वातंत्र्यपूर्व काळातील काहीच मान्य नाही, असा निकाल कोर्टाने द्यावा,’’ असे म्हणत त्यांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या इतिहासाचा संदर्भ देत, स्वातंत्र्यपूर्व काळातील दस्तावेज आणि इतिहासाच्या स्वीकाराबाबतही सवाल उपस्थित केला. सरकारी दस्तावेजांना मान्यता देण्याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**जालना जिल्हाधिकाऱ्यांना थेट आव्हान**

हैदराबाद गॅझेटच्या आधारे प्रलंबित असलेली प्रमाणपत्रांची प्रकरणे तातडीने मार्गी लावण्याचे आव्हान जरांगे पाटील यांनी जालना जिल्हा प्रशासनाला दिले.

जालना जिल्ह्यातील गॅझेटनुसार प्रलंबित प्रकरणे मार्गी लावून दाखवावीत, अशी मागणी करत त्यांनी, ‘‘जालना जिल्ह्यातील बाकीची प्रकरणे मार्गी लावून दाखवा, मग मी सात-आठ घोट पाणी पितो,’’ असेही म्हटले.

त्यामुळे प्रमाणपत्रांच्या प्रलंबित प्रकरणांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने या प्रकरणांवर किती वेगाने कार्यवाही केली जाते, याकडे आता (पान २ वर)

*जालना महापालिका स्थायी समितीची बैठक संपन्न*

# कर मूल्यनिर्धारणातून १०० कोटींच्या उत्पन्नाचे उद्दिष्ट



**जालना - प्रतिनिधी**

जालना महापालिकेच्या स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवारी सकाळी ११ वाजता भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृहात स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी कर मूल्यनिर्धारणाचे काम गतीने पूर्ण करण्याबरोबरच स्वच्छता व्यवस्था, महापालिकेच्या आर्थिक बाबींवरील नियंत्रण, बी.ओ.टी. प्रस्तावांची सद्यस्थिती तसेच सणासुदीच्या काळातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.

स्थायी समितीच्या बैठकीत एकूण सहा विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक महत्त्वाचा विषय कर मूल्यनिर्धारणाचा होता. महापालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीमार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण व कर मूल्यनिर्धारणाचे काम सुरू असून, या कामाच्या प्रगतीचा अहवाल बैठकीत सादर करण्यात (पान २ वर)

# संपादकीय...

## पाहणीपुरती नव्हे, अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची

गणेशोत्सव हा जालना शहरातील सर्वाधिक लोकसहभाग असलेला उत्सव. उत्सवाच्या शेवटच्या टप्प्यात होणारे गणेशमूर्ती विसर्जन हे प्रशासनाच्या नियोजनक्षमतेची खरी परीक्षा ठरते. मोती तलावावरील गणेश विसर्जन कुंडाची महापौर व उपमहापौरांनी केलेली पाहणी आणि त्यानंतर आयुक्तांसह घेतलेली संयुक्त बैठक ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपातळी, सुरक्षा, अग्निशमन व्यवस्था, निर्माल्य संकलन, एनओसी आणि विभागीय समन्वय अशा जवळपास सर्वच महत्त्वाच्या मुद्यांचा आढावा घेण्यात आला आहे. मात्र आता प्रश्न एवढाच आहे की, या सूचना प्रत्यक्ष विसर्जनाच्या दिवशी किती प्रभावीपणे अमलात उतरतात? जालना शहरात प्रत्येक मोठ्या उत्सवाच्या आधी अशा प्रकारच्या पाहण्या आणि बैठका होत असतात. अधिकारी जबाबदाऱ्या निश्चित करतात, लोकप्रतिनिधी सूचना देतात आणि प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्ष गर्दी वाढल्यानंतर वाहतूक कोंडी, अपुरी प्रकाश व्यवस्था, अस्वच्छता, विस्कळीत पार्किंग, धोकादायक पाणीपातळी किंवा आपत्कालीन यंत्रणेचा विलंब अशा अडचणी समोर आल्या तर पूर्वतयारीचा उद्देशच अपूर्ण राहतो. म्हणूनच यंदाच्या तयारीकडे केवळ औपचारिक पाहणी म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष कृती आराखड्याच्या कसोटीवर पाहिले गेले पाहिजे. मोती तलाव हे शहरातील प्रमुख विसर्जनस्थळ असल्याने तेथे हजारो गणेशभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असते. अशा वेळी एकाच ठिकाणी स्वच्छता, पाणी, वीज, सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय मदत आणि आपत्कालीन यंत्रणा या सर्व व्यवस्था एकत्रितपणे सक्षम असणे आवश्यक आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रकाशयोजना ही केवळ सोयीची बाब नसून सुरक्षेची गरज आहे. हायमास्ट दिवे, अतिरिक्त प्रकाश व्यवस्था आणि जनरेटरची पर्यायी सुविधा उपलब्ध ठेवण्याचा निर्णय योग्य आहे; पण या सर्व साधनांची विसर्जनापूर्वी प्रत्यक्ष चाचणी होणे अधिक महत्त्वाचे आहे. निर्माल्य संकलनाची स्वतंत्र व्यवस्था हा पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. धार्मिक श्रद्धा आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची गरज नाही. हार, फुले, दुर्वा, सजावटीचे साहित्य आणि इतर पूजासाहित्य तलावात न जाता स्वतंत्र संकलन केंद्रात जमा झाले तर जलप्रदूषण कमी होऊ शकते. महापालिकेने केवळ निर्माल्य पात्रे ठेवणे पुरेसे नाही; ती वेळोवेळी रिकामी करणे, संकलित निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणेही आवश्यक आहे. सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जन कुंडातील पाणीपातळीचा मुद्दा अत्यंत संवेदनशील आहे. गर्दीत एखादा व्यक्ती पाण्यात घसरल्यास काही सेकंदांचा विलंबदेखील गंभीर परिणाम घडवू शकतो. त्यामुळे कुंडाभोवती मजबूत बॅरिकेडिंग, प्रशिक्षित पोहणारे कर्मचारी, लाइफ जॅकेट, दोरखंड, बचाव साहित्य आणि सतत देखरेख आवश्यक आहे. अग्निशमन दलाची उपस्थितीही तितकीच महत्त्वाची आहे. परंतु आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष आणि त्वरित संपर्कासाठी स्पष्ट व्यवस्था केली तर सुरक्षा आणखी मजबूत होऊ शकते. वाहतूक आणि पार्किंगचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या मंडळांची वाहने, खासगी वाहने, दुचाकी आणि पायी येणारे भाविक यांची संख्या मोठी असते. मोती तलाव परिसरात प्रवेश आणि निर्गमनाचे स्वतंत्र मार्ग, वाहनांसाठी निश्चित पार्किंग क्षेत्र, पोलिस आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा संयुक्त बंदोबस्त तसेच मोठ्या मंडळांच्या विसर्जनासाठी वेळेचे नियोजन केल्यास गर्दीचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक होऊ शकते. महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांनी संयुक्त बैठक घेणे ही सकारात्मक बाब आहे. कारण उत्सवाचे नियोजन केवळ एका विभागाचे काम नसते. स्वच्छता विभागाने कचरा उचलला पण विद्युत विभागाने प्रकाश व्यवस्था केली नाही, अग्निशमन दल सज्ज होते पण वाहतूक व्यवस्थापन कोलमडले, किंवा पाणीपातळी नियंत्रणात होती पण प्रवेशमार्ग अडथळ्यांनी भरलेले होते, तर संपूर्ण व्यवस्था प्रभावित होते. त्यामुळे विभागांमधील समन्वयासाठी एकच जबाबदार नियंत्रण प्रणाली आवश्यक आहे.

यंदा प्रशासनाने आणखी एक पाऊल पुढे टाकून प्रत्येक विभागासाठी निश्चित अधिकारी, त्यांचा संपर्क क्रमांक, जबाबदारी आणि पर्यायी अधिकारी यांची सार्वजनिक माहिती जाहीर करावी. नागरिकांना किंवा गणेश मंडळांना अडचण आल्यास कुणाशी संपर्क साधायचा, याबाबत संभ्रम राहू नये. तसेच सीसीटीव्हीच्या माध्यमातून विसर्जनस्थळावर सतत देखरेख ठेवणे आणि नियंत्रण कक्षातून परिस्थितीचे निरीक्षण करणेही उपयुक्त ठरू शकते. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असला तरी त्याचे व्यवस्थापन विज्ञान, शिस्त आणि प्रशासनिक नियोजनावर अवलंबून असते. भाविकांची सुरक्षा, पर्यावरणाचे रक्षण आणि शहरातील वाहतुकीचे नियोजन यांचा समतोल राखणे हे महापालिकेसमोरील मोठे आव्हान आहे. महापौर व उपमहापौरांनी केलेली पाहणी आणि प्रशासनाला दिलेल्या सूचना हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र खरी परीक्षा विसर्जनाच्या दिवशी होणार आहे. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित, प्रकाशमान आणि शिस्तबद्ध विसर्जन व्यवस्था प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली, तरच या पाहणीचा आणि बैठकीचा खरा अर्थ सिद्ध होईल. जालना महानगरपालिकेने आता ''सूचना दिल्या'' या टप्प्यावर न थांबता ''सूचनांची अंमलबजावणी झाली'' हे दाखवून देण्याची वेळ आली आहे. कारण गणेशभक्तांसाठी प्रशासनाची खरी सेवा ही बैठकीतील आश्वासनांत नसून विसर्जनस्थळावरील प्रत्यक्ष व्यवस्थेत दिसली पाहिजे.

# पान १ वरुन...

## औद्योगिक शिखर...

सुविधा उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे वाहतूक वेळ व खर्च कमी करण्याबरोबरच जालना आणि आसपासच्या जिल्ह्यांतील उद्योगांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**कडून 'प्लग-अँड-प्ले' सुविधेची ग्वाही**

गुंतवणूकदारांना जालन्यात उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ने महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. सेवायुक्त भूखंडांसाठी प्लग-अँड-प्ले मॉडेल, क्षेत्रासाठी २० टक्के आरक्षण आणि गुंतवणूकदारांना तातडीने उद्योग सुरू करता यावा यासाठी प्रशासकीय सहकार्य देण्याची ग्वाही कडून देण्यात आली.

जमीन, पायाभूत सुविधा, शासकीय प्रोत्साहने आणि व्यवसाय सुलभतेच्या मुद्द्यांवर चे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंग कुशवाह यांनी मार्गदर्शन केले.

**पोलाद-ऑटो उद्योगाबरोबर कृषी व पर्यटन क्षेत्रावरही भर**

जालना जिल्ह्याची ओळख केवळ पोलाद आणि ऑटो-पूरक उद्योगांपुरती मर्यादित नसून कृषी-प्रक्रिया, बियाणे उद्योग, रेशीम व रेशीमकीट संगोपन, वाइन आणि पर्यटन या क्षेत्रांमध्येही मोठ्या विकासाच्या संधी असल्याचे परिषदेत अधोरेखित करण्यात आले. 'एक जिल्हा, एक उत्पादन' उपक्रमाच्या अनुषंगाने जालना हे भारतातील महत्त्वाचे सळी उत्पादन केंद्र असून राज्यातील प्रमुख बियाणे उत्पादक जिल्ह्यांपैकी एक असल्याचेही सांगण्यात आले. कृषी क्षेत्राशी संबंधित प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतमालाला बाजारपेठ, शेतकऱ्यांना मूल्यवर्धन आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

**'जालना गुंतवणूक परिषद केवळ योजना घेऊन आलेली नाही'**

जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी परिषदेत जालन्याच्या औद्योगिक विकासासाठी प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. जालन्याची औद्योगिक क्षमता आणि उपलब्ध पायाभूत सुविधांच्या आधारे गुंतवणूकदारांना प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

''जालना गुंतवणूक परिषदेत केवळ योजना घेऊन येत नाही तो पुरावा घेऊन येतो. आमचे ड्राय पोर्ट कार्यान्वित आहे, कनेक्टिव्हिटी वाढत आहे आणि आज पहिल्या वचनबद्धता आधीच मांडल्या गेल्या आहेत. जो कोणी गुंतवणूकदार जालना निवडेल, त्याच्यासाठी प्रशासन सुविधादाता म्हणून काम करेल, अडथळा म्हणून नाही.''असा विश्वास जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी व्यक्त केला.

**चार प्रमुख मागण्यांचा पुनरुच्चार**

जालना फर्स्ट सिटिझन फोरमने जिल्ह्याच्या औद्योगिक व नागरी विकासाला गती देण्यासाठी शासनाकडे यापूर्वी मांडलेल्या चार प्रमुख मागण्यांचा परिषदेत पुन्हा उच्चार केला.

यामध्ये ड्राय पोर्टला शेंद्रा-बिडकीन मार्गिकेशी जोडणारा रस्ता,

जालना-छत्रपती संभाजीनगर शटल रेल्वे, नवीन टप्प्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे,

तसेच च्या नेतृत्वाखाली नियोजित नागरी विकास या मागण्यांचा समावेश आहे.

या चारही बाबी जालना जिल्ह्याच्या भविष्यातील औद्योगिक विस्तारासाठी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

दोन पॅनल चर्चांतून उद्योगविश्वाचे मत जाणून घेतले.

परिषदेत दोन महत्त्वपूर्ण पॅनल चर्चांचे आयोजन करण्यात आले. पहिली चर्चा 'जालना गुंतवणूक दृष्टिकोन' या विषयावर झाली. यात लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे कार्यकारी संचालक मधुर गुप्ता, भाग्यलक्ष्मी ग्रुपचे संचालक नितिन काबरा, लघु उद्योग भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रविंद्र वाडिया, ऑल इंडिया वाईन प्रोड्यूसर्स असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश होळकर, एंड्यूरन्स टेक्नॉलॉजीजचे अध्यक्ष संजय संघई आणि इंडियन ऑयल कॉर्पोरेशनचे महाव्यवस्थापक संदीप कोहली सहभागी झाले.

दुसरी चर्चा 'मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क आणि जालन्याची लॉजिस्टिक्स क्षमता' या विषयावर झाली. टोयोटा किर्लोस्कर मोटारचे महाव्यवस्थापक रवी सोनटक्के, इंडस्ट्रियल पार्क डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक अमित दामोदर चुघ, विकास कोल अँड मिनरल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रजत राव, बजाज ऑटोचे वरिष्ठ व्यवस्थापक सुधीर कामथ आणि गरवारे पॉलिएस्टर्सचे वरिष्ठ महाव्यवस्थापक जयकुमार नायर यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

दोन्ही चर्चांनंतर प्रश्नोत्तराचे खुले सत्र घेण्यात आले. यामध्ये उद्योग क्षेत्रासमोरील अडचणी, गुंतवणुकीच्या संधी, लॉजिस्टिक्स खर्च, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यतांवर चर्चा झाली.

**'द चेंजमेकर्स'चा गौरव**

परिषदेच्या माध्यमातून जालना जिल्ह्याच्या प्रगतीत विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा 'द चेंजमेकर्स' या उपक्रमांतर्गत सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजनाने झाली. त्यानंतर गोविंद गोयल यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला.

रितेश मिश्रा यांनी जालना जिल्ह्याच्या औद्योगिक वाटचालीचा आढावा घेत परिषदेची पार्श्वभूमी मांडली. जालना फर्स्टच्या अध्यक्षांनी स्वागतपर भाषण केले, तर धवल मिश्रिकोटकर यांनी परिषदेची उद्दिष्टे स्पष्ट केली.

**राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांची उपस्थिती**

परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून चे अध्यक्ष गौरव दयाल, आणि चे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंग कुशवाह, उपस्थित होते. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, तसेच विभागीय आयुक्तांनी प्रास्ताविक भाषणे केली.

महिकोच्या माध्यमातून कृषी-नाविन्य आणि जालन्याच्या बियाणे उद्योगावर बीजभाषणातून प्रकाश टाकण्यात आला. त्यानंतर चे व्यवस्थापकीय संचालक पी. प्रभाकरन यांनी जालना हे उदयोन्मुख गुंतवणूक केंद्र म्हणून मांडले. मराठवाड्यातील ज्येष्ठ उद्योजक राम भोगले आणि चे अध्यक्ष गौरव दयाल यांनी समारोपाच्या बीजभाषणातून जालन्याच्या राष्ट्रीय व्यापार आणि बंदर जोडणीच्या क्षमतेवर भर दिला.

परिषदेनंतर ड्राय पोर्टची पाहणी

दिवसभराच्या चर्चेनंतर प्रतिनिधींनी नेटवर्किंग लंचमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क आणि जालना ड्राय पोर्टला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील सुविधा व लॉजिस्टिक्स व्यवस्थेची पाहणी केली.

या परिषदेला सेंट-गोबेन धोरणात्मक भागीदार, बेअरिंग्स सहयोगी भागीदार आणि चॉयस कन्सल्टन्सी नॉलेज पार्टनर म्हणून सहकार्य लाभले.

जालन्याच्या औद्योगिक भविष्यासाठी निर्णायक पाऊल

एकूणच, पहिल्याच औद्योगिक शिखर परिषदेत मोठ्या उद्योगांकडून व्यक्त झालेली गुंतवणुकीची तयारी, स्थानिक व्हेंडर विकसित करण्यासाठी पुढे आलेल्या कंपन्या, इंडियन ऑयलचा गॅस पुरवठा करार, ची प्लग-अँड-प्ले सुविधेची भूमिका आणि ड्राय पोर्टला केंद्रस्थानी ठेवून मांडण्यात आलेली लॉजिस्टिक्स क्षमता यामुळे जालना जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळण्याची चिन्हे दिसून आली आहेत.

मोठ्या उद्योगांच्या गुंतवणुकीसोबतच स्थानिक , ऑटो-पूरक उद्योग, कृषी-प्रक्रिया, बियाणे, रेशीम, वाइन आणि पर्यटन क्षेत्राचा विस्तार झाल्यास जालना जिल्ह्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र या औद्योगिक क्षमतेला प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतरित करण्यासाठी जमीन, रस्ते, रेल्वे कनेक्टिव्हिटी, नागरी पायाभूत सुविधा आणि प्रशासनिक सुलभता या बाबी वेळेत पूर्ण होणे तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

पहिल्या औद्योगिक शिखर परिषदेत मांडण्यात आलेल्या गुंतवणुकीच्या घोषणा आणि मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत वेगाने होते, यावर जालना जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाच्या पुढील टप्प्याची दिशा निश्चित होणार आहे.

## गॅझेट, सातारा...

आंदोलनकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

**आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याची मागणी**

मराठा आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यांचा मुद्दाही जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. आंदोलनकर्त्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

गुन्हे मागे घ्यायचे नसतील तर आंदोलन हाताळताना संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून झालेल्या कारवाईचीही चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, अशी आक्रमक भूमिका त्यांनी मांडली.

या मागणीमुळे आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

**३५० मराठा तरुणांच्या नियुक्तीचा मुद्दा**

मराठा समाजातील सुमारे ३५० तरुणांना पदावर नियुक्ती मिळालेली नसल्याचा मुद्दा जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. संबंधित तरुणांना तातडीने नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली.

यासोबतच मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवरही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांसाठी ओबीसींचा जीआर लागू करावा आणि विद्यार्थ्यांनी भरलेली फी परत करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

त्यामुळे सध्याच्या आरक्षणाच्या मुद्द्यासोबतच शिक्षण, रोजगार आणि नियुक्त्यांशी संबंधित मागण्याही आंदोलनाच्या केंद्रस्थानी आल्या आहेत.

**आमदार लाडांनी पाणी पाजले; मात्र उपोषण सुरूच**

दरम्यान, आमदार लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांना पाणी पाजले. यावेळी जरांगे यांनी ''दादांचे मनापासून आभार'' असे म्हणत त्यांचे आभार मानले.

मात्र पाणी घेतले असले तरी उपोषण मागे घेतले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

''दोन दिवसांत काम झालं नाही तर सलाईन काढून फेकतो; पण उपोषण सुटणार नाही,'' असा थेट इशारा त्यांनी यावेळी सरकारला दिला. त्यामुळे पुढील दोन दिवस सरकारसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे.

यावेळी जरांगे पाटील यांनी विखे-पाटील यांच्यावरही टीका केली. तसेच शिंदे आणि फडणवीस यांच्यात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र त्याचवेळी ''त्यांचं आणि आमचं शत्रुत्व नाही,'' असे स्पष्ट करत त्यांनी वैयक्तिक शत्रुत्व नसल्याचेही सांगितले.

त्यामुळे सरकारमधील नेत्यांबाबत टीका करत असतानाच राजकीय संघर्षाला वैयक्तिक स्वरूप देण्यास आपण इच्छुक नसल्याचा संदेशही त्यांनी दिल्याचे दिसून येते.

एकीकडे मनोज जरांगे पाटील यांनी मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण मागे न घेण्याची भूमिका घेतली आहे, तर दुसरीकडे सरकारसमोर गॅझेटची अंमलबजावणी, सातारा-कोल्हापूर संस्थानचा जीआर, प्रलंबित प्रमाणपत्रे, आंदोलनातील गुन्हे, नियुक्त्या आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांसह विविध मुद्द्यांवर निर्णय घेण्याचे आव्हान आहे.

''सगळं झाल्याशिवाय उपोषण सुटणार नाही'', या जरांगे पाटील यांच्या स्पष्ट भूमिकेमुळे आता सरकारकडून पुढील दोन दिवसांत कोणती पावले उचलली जातात, याकडे मराठा समाजाचे आणि राज्याचे लक्ष लागले आहे.

मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा जरांगे पाटील यांनी दिल्याने आगामी काळात मराठा आरक्षण आंदोलनाची दिशा काय असेल, याबाबतही उत्सुकता निर्माण झाली आहे.

## कर मूल्यनिर्धारणातून...

आला.

**सहा हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण**

यावेळी महापालिकेच्या कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी शहरातील सुमारे ६ हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याची माहिती स्थायी समितीला दिली. तसेच शहरातील विविध भागांमध्ये एकूण सहा टीमच्या माध्यमातून सर्वेक्षणाचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले. कर मूल्यनिर्धारणाचे काम अधिक व्यापक आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण करून महापालिकेच्या उत्पन्नाचा स्रोत मजबूत करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात मोठी वाढ करण्याच्या दृष्टीने शहरातील मालमत्तांचे अचूक कर मूल्यनिर्धारण होणे आवश्यक असल्याचे सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी स्पष्ट केले. कर मूल्यनिर्धारणाचे काम निर्धारित वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करून महापालिकेला भविष्यात सुमारे १०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व एजन्सीला दिल्या.

**महापालिकेच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश**

महापालिकेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणि नियोजन राहावे, यासाठी प्रत्येक विभागाने आपल्या कामकाजाची माहिती स्थायी समितीसमोर वेळोवेळी मांडावी, असे निर्देश सभापतींनी दिले.

महापालिकेच्या प्रत्येक विभागप्रमुखाने त्यांच्या विभागाला प्राप्त होणारा निधी, त्या निधीचा उपयोग आणि त्यातून प्रस्तावित करण्यात येणाऱ्या कामांची माहिती स्थायी समितीला पूर्वकल्पना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निधी प्राप्त झाल्यानंतर त्याचा विनियोग कोणत्या कामांसाठी करण्यात येणार आहे, याबाबत समितीला माहिती असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**मागील नगरपालिका काळातील ... प्रस्तावांचा अहवाल मागविला**

मागील नगरपालिका काळात मंजूर अथवा प्रस्तावित करण्यात आलेल्या ... (--) योजनांची सद्यस्थिती काय आहे, याबाबतही बैठकीत चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर आहेत, त्यांची अंमलबजावणी झाली आहे का, कोणती कामे प्रलंबित आहेत आणि त्यासंदर्भात महापालिकेची सद्यस्थिती काय आहे, याचा सविस्तर अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

**स्वच्छता निविदा प्रक्रिया तीन दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश**

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी आणि सक्षम करण्यासाठी प्रस्तावित असलेली स्वच्छता निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या स्वच्छता व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये, यासाठी येत्या तीन दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित उपायुक्तांना सभापती पांगारकर यांनी दिले.

शहरातील विविध भागांमध्ये नियमित स्वच्छता, कचरा संकलन आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता याकडे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**गणेशोत्सव, नवरात्रोत्सव व दिवाळीत फॉगिंगवर भर**

आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर शहरातील आरोग्य व स्वच्छता व्यवस्था सक्षम करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळीच्या कालावधीत नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता आवश्यक त्या ठिकाणी नियमित धूर फवारणी (फॉगिंग) करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या.

डासांचा प्रादुर्भाव होणाऱ्या भागांमध्ये तसेच नागरिकांची वर्दळ असलेल्या परिसरात फॉगिंगचे नियोजन करण्यात यावे आणि सणासुदीच्या काळात शहराची स्वच्छता व आरोग्य व्यवस्था सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

**प्रगती अहवाल वेळेत न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई**

स्थायी समितीच्या बैठकीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबतही सभापतींनी स्पष्ट भूमिका मांडली. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागातील विविध कामांचा लेखी प्रगती अहवाल वेळेत स्थायी समितीच्या सन्माननीय सदस्यांना सादर करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कामांची सद्यस्थिती, पूर्ण झालेली कामे, प्रलंबित कामे तसेच त्यामागील कारणे याबाबतची माहिती नियमितपणे समितीसमोर येणे आवश्यक आहे. प्रगती अहवाल सादर करण्यात टाळाटाळ करणाऱ्या किंवा वेळेत अहवाल न देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी दिला.

**सदस्यांनी मांडले विविध विषय**

बैठकीच्या कामकाजात स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य भास्कर आबा दानवे, अक्षय गोरंट्याल, महावीर ढक्का, अशोक पवार, महेश निकम यांच्यासह इतर सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सदस्यांनी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून आपल्या सूचना व भूमिका मांडल्या. शहरातील विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच महापालिकेच्या आर्थिक स्थितीशी संबंधित विविध मुद्द्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

**विकासकामांना गती देण्यावर भर**

महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाल्यास शहरातील विकासकामांना अधिक गती देता येईल, यासाठी उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यासोबतच उपलब्ध निधीचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करण्यावर स्थायी समितीने भर दिला. कर मूल्यनिर्धारणाचे काम प्रभावीपणे पूर्ण झाल्यास महापालिकेच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

त्याचबरोबर प्रशासनातील प्रत्येक विभागाने आपल्या कामाची जबाबदारी निश्चितपणे पार पाडावी, कामांचा नियमित आढावा घ्यावा आणि स्थायी समितीला आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश सभापतींनी दिले.

बैठकीस महापालिकेचे संबंधित अधिकारी, विविध विभागांचे विभागप्रमुख, कर्मचारी तसेच स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. बैठकीतील सर्व विषयांवर चर्चा झाल्यानंतर उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार मानून स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहरराव पांगारकर यांनी बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

# बदलत्या माध्यमविश्वात पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा – उपसंचालक प्रवीण टाके

**छत्रपती संभाजीनगर -प्रतिनिधी**

बदलत्या माध्यमविश्वात पारंपरिक पत्रकारितेसोबत डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढले आहे. पत्रकारांनीही आता सोशल मीडिया व नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. माहिती व जनसंपर्क विभागही बदलत्या माध्यम व्यवस्थेनुसार आपल्या कार्यपद्धतीत बदल करीत आहे, असे प्रतिपादन विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी केले. छत्रपती संभाजीनगर विभागाचे नवनियुक्त उपसंचालक प्रवीण टाके यांची बुधवारी (दि.२) पत्रकार, संपादकांनी भेट घेतली. त्यानिमित्त दुपारी ४ वा. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात संवाद साधला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक सुरेश पाटील, माहिती अधिकारी संजीवनी जाधव पाटील यांच्यासह विविध दैनिके, साप्ताहिक वृत्तपत्रांचे संपादक, प्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते. नव्याने रुजू झालेले उपसंचालक प्रवीण टाके तसेच सहायक संचालक सुरेश पाटील व माहिती अधिकारी संजीवनी जाधव पाटील यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींना आपली ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी सर्व संपादक पत्रकारांचे स्वागत केले. तसेच पत्रकारांचा परिचय करुन दिला.स्थानिक स्तरावरील पत्रकारांच्या समस्या यावेळी अधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या. उपसंचालक प्रवीण टाके म्हणाले की, डिजिटल माध्यमांमुळे पत्रकारितेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पत्रकारांनी डिजिटल माध्यमांचे आव्हान स्वीकारून सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा.पत्रकारांसाठी विविध विषयांवर प्रशिक्षण आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. पत्रकारांच्या समस्या, दैनंदिन अडचणी सोडवण्यास प्रशासनाचा प्राधान्य क्रम राहील.

# हैदराबाद गॅझेट जीआर मधील बदमाशी लपविण्यासाठी ना. राधाकृष्ण विखेपाटील आणखी किती खोटरडे पिल्लु सोडणार?

व्हाट्सअप स्नातक राधाकृष्ण विखे पाटील यांचे करायचे काय? हा प्रश्न दिवसोंदिवस गहन आणि संतापजनक होत चालला आहे! समर्थ रामदासांनी पढतमुर्ख हा शब्द कदाचित या अवतारी पुरुषाचा जन्म होईल आणि त्याचे कवतिके बोल कसे असतील हे आगावू कल्पूनच योजला असावा यात माझ्या मनात तरी कसलाच संदेह नाही! परंतु वांझ हैदराबाद गॅझेटचे खोटे पचवण्यासाठी हा सराईत खोटारडेपणा आहे हे ही विसरता येत नाही!

आता बघा जात पडताळणी समित्या बरखास्तीचा सल्ला देणारे हे व्हाट्सअप स्नातक महाशयांनी नवीन काय पिल्लु सोडलेय? तर् १९९४ ला शरद पवार यांनी मंडल आयोगात मराठा जात टाकली असती तर मराठा आरक्षणाचा प्रश्नच शिल्लक राहिला नसता! आणि आजच्या अनेक व्हाट्सअप स्नातकाना हे खरेच आहे असे वाटते! पण वस्तुस्थिती काय आहे ती आपण तपासून पाहू!

मंडल आयोग स्थापना, अहवाल सादर आणि अंमलबजावणी.! भारतातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना ओळखण्यासाठी मोरारजी देसाई सरकारने १ जानेवारी १९७९ रोजी मंडल आयोगाची स्थापना केली. *स्थापना दिनांक: १ जानेवारी १९७९, सरकार: पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाचे सरकार, *अधिकृत नाव: दुसरा मागासवर्गीय आयोग (संविधानाच्या कलम ३४० अन्वये नियुक्त), *अध्यक्ष: बिंधेश्वरी प्रसाद (बीपी) मंडल, बिहारचे माजी खासदार आणि माजी मुख्यमंत्री. *अहवाल सादर करण्याची तारीख: ३१ डिसेंबर १९८०, *प्रमुख निष्कर्ष: आयोगाने ३,७४३ जाती आणि समुदायांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग (), जे सामान्यतः इतर मागासलेले वर्ग () म्हणून ओळखले जातात, असे घोषित केले असून, ते भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे ५२% असल्याचा अंदाज आहे. !

* यात मराठा जात होती का तर- नाही! बरं कुणबी होती का तर- होती तसेच कुणबी ही स्वतंत्र जात पहिल्या मागासवर्गीय आयोग काकासाहेब कालेलकर आयोगात ही होती/आहे आणि इंग्रजांनी या देशात आणि हैदराबाद सहित सगळ्या संस्थानात शास्त्रीय पद्धतीने नोंदणी चालू केले त्यासाठी वेगवेगळी संस्थानिहाय गॅझेट छापली त्यातही होती /आहे! उदा. हैदराबाद गॅझेट! (पण यात कुणबी शिवाय गटात मराठा जात स्वतंत्र नोंद आहे! हे या पढतमुर्खाना कोण सांगणार)

*निष्कर्ष: यामध्ये मागासलेपणाचे मूल्यांकन करण्यासाठी ११ सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक निर्देशकांचा वापर करण्यात आला. *मुख्य शिफारस: केंद्र सरकारच्या नोकऱ्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी २७% आरक्षण, ज्यामुळे एकूण आरक्षण (अनुसूचित जाती/अनुसूचित




जमाती आरक्षणासह) ४९.५% झाले. तसेच शैक्षणिक संस्थांमध्येही आरक्षणाची शिफारस करण्यात आली. *अंमलबजावणी विलंब: तो अहवाल अमलात न येता जवळपास एक दशकभर सरकारी कार्यालयांमध्ये धूळ खात पडून राहिला. *नेमकी अंमलबजावणीची तारीख: ७ ऑगस्ट, १९९०, सरकार: पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्याद्वारे अंमलात आणले गेले/संविधानाने लागू केले. (त्यातील सर्वोच्च न्यायालयात इंद्रा सहानी प्रकरण आहेच) आणि सर्वोच्च न्यायालयाने १९९२ मध्ये मंडल आयोग, शिफारशी आणि अंमलबजावणीला अंतिमतः वैधानिक मान्यता दिली.! या सर्व टप्प्यात मराठा जात ओबीसी यादीत होती /आहे की कसे? तर मंडल आयोगाने मराठ्यांना मागास जात म्हणून मान्यता नाकारली आहे आणि कुणबी ही पूर्वापार मागास जात असल्याचं मान्य केले आहे! म्हणजेच देशात वैधानिक, कायद्याने व सर्वोच्च न्यायालयाच्या मान्यतेने केंद्रीय यादीत कुणबी ही मागास आणि मराठा ही पुढारलेली (ओबीसी मधे समाविष्ट नसलेली) जात आहे ही घटनात्मक वस्तुस्थिती आहे हे सूर्यप्रकाशा एव्हढे स्पष्ट आहे!

आता ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणताहेत ते १९९४ प्रकरण काय आहे?तर् १९९४ या वर्षी राज्य सरकारने आणि तत्कालीन मुख्यमंत्री (श्री. शरद पवार इति-विखेपाटील) यांनी केंद्राच्या ओबीसी जातीतूनच राज्याची ओबीसी जातीची यादी जाहीर केली आणि त्यात ८३ क्रमांकावर कुणबी ही जात ठेवली/आहे! कारण केंद्राच्या यादीत कुणबी ही मान्यताप्राप्त जात म्हणून नोंदवली आहेच आणि संविधान मान्यताप्राप्त आहे! यात मराठा आहे का तर नाहीच कारण ती पुढारलेली आहे असे मंडल आयोगाचा अधिकृत निष्कर्ष आहे आणि त्यास सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे.

आता साधा बालवाडी लेवल प्रश्न! मोरारजी देसाई सरकारने १९७९ वर्षी नेमलेल्या; ३१ डिसेंबर १९८० मध्ये अंतिम अहवाल दिलेल्या आणि व्ही. पी. सिंग सरकारने १९९० मध्ये स्वीकारलेल्या मंडल आयोग अहवालात नसलेली ओबीसी जात म्हणजे मराठा १९९४ चा राज्याचा एक मुख्यमंत्री घालू किंवा काढू शकतो का? त्याला तो वैधानिक/कायदेशीर अधिकार आहे का? तर नाही...नाही... नाही... मग राधाकृष्ण विखेपाटील काय सन्माननीय कै. एकनाथराव तथा बाळासाहेब विखे पाटील वा डॉ. सुजित विखेपाटील मुख्यमंत्री असता तरी १९९४ सालच्या ओबीसी यादीत नसलेली मराठा जात घालू शकला नसता.! मग मराठा आरक्षण विषयक मंत्रीमंडळ ऊपसमितीचे अध्यक्ष सन्माननीय राधाकृष्ण विखे पाटील असं काय वारं लागल्यागत एक पाठीमागे एक बरळत आहेत...? तर एकत्रसमर्थ उवाच तस्स पट्टीचा पढतमुर्ख! आणि यांचीच स्वतः ची हैदराबाद गॅझेट मध्ये केलेली शातिर बदमाशी चर्चेत येऊन हैदराबाद संस्थान मधील मराठ्यांना आपणच शासन आदेश कार्यपद्धतीत कसे शिताफीने फसवले आहे हा मुद्दा /विषय चर्चेला येऊन किमान मराठवाड्यातील मराठ्यांनी आपल्यालाच गव्यगोमूत्र लेपित दगडधोंडे मारू नये म्हणून....आता ओळखा खरा बदमाश सम्राट कोण आहे? मी नाव सांगायलाच पाहिजे का? किमान आपापलीयत्ता वाढवा भावड्यांनो...



**डॉ. संजय लाखेपाटील**
**राज्य समन्वयक**
**सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र**

## विभागीय लोकशाही दिन मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी आयोजन

**छत्रपती संभाजीनगर -प्रतिनिधी**

प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या सोमवारी नियमितपणे विभागीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. परंतू या महिन्यातील दुसऱ्या सोमवारी (१४) रोजी गणेश चतुर्थी निमित्त सुट्टी असल्याने त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस मंगळवारी, १५ सप्टेंबर २०२६ रोजी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११.०० वाजता होणाऱ्या या लोकशाही दिनात जिल्हास्तरावर न सुटलेल्या तसेच तक्रारदारांचे समाधान न झालेल्या प्रश्नांवर सुनावणी करण्यात येणार आहे. तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्वीकारण्यात येणार आहेत.अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.

जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## गणेश विसर्जन मार्गाची महापालिका, महावितरण व पोलिसांकडून संयुक्त पाहणी

*मिरवणुकीत अडथळे निर्माण होऊ नयेत यासाठी प्रशासन सज्ज; विद्युत तारा, खड्डे, उघडे डीपी, नाले व स्वच्छता व्यवस्थेचा घेतला आढावा*

**जालना - प्रतिनिधी**

आगामी श्री गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील विसर्जन मिरवणुकीचा मार्ग सुरक्षित आणि सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका, महावितरण आणि पोलिस प्रशासनाच्या वतीने संयुक्तपणे प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. विसर्जन मिरवणुकीदरम्यान भाविक, गणेशभक्त तसेच नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि मिरवणुकीच्या मार्गावर कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी विविध विभागांच्या कामांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. यावेळी उपमहापौर राजेश राऊत, महापालिका आयुक्त अंजली शर्मा (भाप्रसे), सदरबाजार पोलीस स्टेशनचे



पोलीस अधिकारी भारती यांच्यासह महापालिकेचे बांधकाम अभियंता, विद्युत विभागाचे अभियंता, स्वच्छता प्रमुख, गार्डन विभागाचे प्रमुख, महावितरण विभागाचे अभियंता तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**विसर्जन मार्गावरील प्रत्येक बाबीची प्रत्यक्ष पाहणी**

गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत आणि कोणत्याही अडथळ्याविना पार पडावी, यासाठी प्रशासनाने विसर्जन मार्गावरील विविध बाबींची बारकाईने पाहणी केली. यामध्ये रस्त्यांची अवस्था, स्वच्छता व्यवस्था, विद्युत व्यवस्था, रस्त्यांवरील खड्डे, नाल्यांवरील झाकणे तसेच विद्युत सुरक्षेशी संबंधित विविध बाबी तपासण्यात आल्या. मिरवणुकीच्या मार्गावर लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, धोकादायक ठिकाणी असलेले विद्युत खांब, उघडे डीपी आदी बाबींची पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

मिरवणुकीदरम्यान मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उपस्थित राहत असल्याने विद्युत सुरक्षेला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी धोकादायक विद्युत तारा व इतर बाबी तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले.

**रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या सूचना**

विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर असलेल्या रस्त्यांवरील खड्ड्यांचीही प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान वाहनांची तसेच गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या मंडळांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ राहणार असल्याने रस्त्यांची स्थिति चांगली असणे आवश्यक आहे.

# 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' - संतोष आवटी

**दत्ता देशमुख**

मानव सेवा हीच ईश्वर सेवा (किंवा मानव सेवा हीच माधव सेवा / जीव सेवा ही शिव सेवा) हा विचार प्रामुख्याने स्वामी विवेकानंद यांच्या विचारांशी जोडला जातो.महत्त्वाची माहितीप्रेरणा: स्वामी विवेकानंद यांनी मानवाच्या आणि दीन-दुबळ्यांच्या सेवेलाच खरी ईश्वरी पूजा मानले आहे.अर्थ: माणसातील देव ओळखून निस्वार्थपणे केलेली मदत म्हणजेच खरी ईश्वरी भक्ती होय.स्वामी विवेकानंद ने कहा था ''जीव सेवा ही शिव सेवा है आपला देश म्हणजे ,भारत देश ,या देशाला भारत माता या नावाने आपण जयघोष करत असतो, म्हणजे मला सांगायचे आहे की ही माता आपल्या मुलाबाळांना चांगल्या पद्धतीने सांभाळते का? कारण या ठिकाणी बरीचशी गरीब मुले आहे आज त्यांना काही आजार एवढा गंभीर झालेलाअसतो की त्या आजारासाठी त्यांच्याकडे एवढे पैसे नाही उदाहरणार्थ आत्ता घडलेल्या हृदय नावाच्या बाळाला दहा कोटी रुपयांची गरज भासते म्हणजे त्या बाळाचा आजार एवढा गंभीर आहे की त्याचे इंजेक्शन दहा कोटी रुपयांच्या पुढे आहे एवढे महागडे इंजेक्शन ती माता विकत घेऊ शकत नाही आज या ठिकाणी पूर्ण महाराष्ट्राने एकत्र येऊन त्या बाळाच्या इंजेक्शन साठी सगळ्यांनी हातभार लावले व त्या बाळासाठी सगळ्यांनी आज मदत केली म्हणजे आपल्या भारतात मानव सेवा हीच ईश्वर सेवा आहे असे मी या ठिकाणी मांडतो आहे, त्यासाठी शासन दरबारी बरीचशी मंडळी काम करतात त्यामध्ये नेतेमंडळी असू द्या बरेचसे सरकारी मंडळी असू द्या यांनी सुद्धा वैद्यकीय क्षेत्रात गरिबांच्या विद्यार्थ्यांसाठी मुलांसाठी माता-भगिनींसाठी असे काही हॉस्पिटल निर्माण करावे जेणेकरून विदेशातून आपल्याला इंजेक्शन मागवण्याची गरज भासणार नाही व वैद्यकीय क्षेत्रात नवीन मुलं मुली जे डॉक्टर होत आहेत त्यांच्यासमोर असे आवाहन द्यावे की आपल्या भारतामध्ये प्रत्येक गोष्टीवर प्रत्येक आजारावर औषधी उपलब्ध व्हायला हवी. जेणेकरून आपला भारत देश कोणत्याही देशाकडे इंजेक्शन साठी मागणी करायची गरज पडणार नाही ,



आज वैद्यकीय क्षेत्रात नीट च्या परीक्षेमध्ये बरेचसे घोटाळे समोर येत आहे की जेणेकरून हुशार विद्यार्थी मागे राहतात आणि श्रीमंत विद्यार्थी पैशाच्या जोरावर पुढे जात आहेत म्हणजे या ठिकाणी जे होणारे डॉक्टर आहे ते उद्या आपल्यालाच मारतील यावर शासनाने विचार केला पाहिजे, आरोग्याचा खेळ होणार आहे,

।मानवता आणि दीनदुबळ्यांची सेवा: इथे गाडगेबाबांनी सुद्धा सांगितले आहे की भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, निवाऱ्याशिवाय असलेल्यांना आसरा आणि अज्ञानाला दूर करणे हीच खरी ईश्वराची भक्ती आहे, असे त्यांचे मत होते

अजून त्यामध्ये दुसरे उदाहरण द्यायचे म्हणजे. पद्मश्री सिंधुताई सपकाळ या अनाथांची माय म्हणून प्रसिद्ध असलेल्या महान भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हजारो अनाथ व निराधार मुलांच्या संगोपनासाठी समर्पित केले.सिंधुताईंचे प्रमुख सामाजिक कार्यअनाथांचे संगोपन: सिंधुताईंनी आपल्या आयुष्यात १५०० हून अधिक अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांचे पालनपोषण केले आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले.संस्थांची स्थापना: त्यांनी पुण्यातील पुरंदर तालुक्यात कुंभारवळण येथे १९९४ मध्ये ममता बाल सदन ची स्थापना केली. याशिवाय चिखलदरा येथेही वसतिगृह सुरू केले.संस्थेचे उपक्रम: त्यांच्या पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ संस्थेअंतर्गत श्री मनशांती छात्रालय, बालगृह, माईनगरी, सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह आणि गोपिका गाय संरक्षण केंद्र चालवले जातात.इतर संघर्ष: केवळ मुलेच नव्हे, तर जंगलातील विस्थापित आदिवासींच्या हक्कासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी शासनदरबारी लढा दिला.

अजून गरिबांसाठी स्वतःच्या जीवाची परवा न करता भारतरत्न''मदर तेरेसा ''यांनी मानव सेवा हीच ईश्वर सेवा या विचाराला धरून या एक महान कार्य केले आहे,मानवतावादी, समाजसेविका आणि नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या रोमन कॅथॉलिक नन होत्या. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गरीब, अनाथ, आणि आजारी लोकांच्या सेवेसाठी समर्पित केले.जीवन परिचयमूळ नाव: अँजेझ गोंजा बोयाजिजू ( )जन्म: २६ ऑगस्ट १९१०, स्कोप्जे (सध्याचे उत्तर मॅसेडोनिया).कर्मभूमी: भारत (विशेषतः कोलकाता).मृत्यू: ५ सप्टेंबर १९९७, कोलकाता.कार्य आणि उपलब्धीभारतात आगमन: मदर तेरेसा १९२९ मध्ये भारतात आल्या. त्यांनी भारताचे नागरिकत्व स्वीकारले होते.मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना: त्यांनी १९५० मध्ये कोलकाता येथे मिशनरीज ऑफ चॅरिटी ( ) या संस्थेची स्थापना केली.समाजसेवा: याद्वारे त्यांनी हजारो कुष्ठरोगी, अनाथ मुले आणि गरिबांना आश्रय व वैद्यकीय मदत दिली.नोबेल पुरस्कार: मानवतावादी कार्यासाठी त्यांना १९७९ मध्ये प्रतिष्ठित नोबेल शांतता पुरस्कार मिळाला.भारतरत्न: त्यांना १९८० मध्ये भारताचा सर्वोच्च नागरिक सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला. हीच ईश्वर सेवा''

पान ४ वरुन....

### ग्रामपंचायतींच्या अधिकारांची...

लोकप्रतिनिधींच्या सहभागाने जिल्हा परिषदेसमोर शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा उपसरपंच डॉ. अनिल सदाशिव सरकटे यांनी दिला आहे. याप्रकरणी आवश्यकता भासल्यास न्यायालयात व भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेकडे दाद मागण्याचा अधिकार राखण्यात आला आहे.

### राहुल गांधींसोबतची...

झाली. राहुल गांधी यांचा साधेपणा, आपुलकीने संवाद साधण्याची पद्धत आणि सामान्य जनतेप्रती असलेली बांधिलकी विशेष प्रेरणादायी असल्याचे डॉ. धानुरे यांनी नमूद केले. परिवारासह राहुल गांधी यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने हा क्षण अधिकच खास आणि अविस्मरणीय ठरला. या भेटीमुळे समाजहित, लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याची प्रेरणा मिळाल्याचे डॉ. विशाल धानुरे यांनी सांगितले. ही भेट केवळ एक आठवण नसून, जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने काम करण्याची नवी ऊर्जा देणारी ठरली, अशी भावना डॉ. धानुरे यांनी व्यक्त केली.

### जालना - परभणी...

झाले आहे. टॉवरवर चढलेल्या आंदोलकांना खाली उतरवण्यासाठी प्रशासन आणि पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. आंदोलकांकडून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत असून, मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली जात आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाकडे सरकारने गांभीर्याने पाहावे आणि त्यांच्या मागण्यांवर तातडीने तोडगा काढावा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. मागण्या मान्य करण्यास विलंब झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. केंधळी येथील रास्ता रोकोमुळे जालनापरभणी मार्गावरील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासन आणि पोलिस यंत्रणा आंदोलनस्थळी दाखल झाली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजामध्ये असंतोष वाढत असल्याचे या आंदोलनातून दिसून येत आहे. केंधळी येथील चक्का जाम आंदोलन किती काळ सुरू राहणार आणि प्रशासन आंदोलकांशी चर्चा करून वाहतूक कधी सुरळीत करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. सरकारकडून जरांगे यांच्या मागण्यांबाबत तातडीने निर्णय न झाल्यास आंदोलनाचा विस्तार होण्याची शक्यता आंदोलकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आगामी काळात जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

### दीपक रणनवरे...

यांनी ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यावर चर्चा करण्यासाठी शासनाने ब्राह्मण समाजाच्या एका शिष्टमंडळासाठी वेळ निश्चित करावा, आपल्या मागणीबाबत लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी केली. आपल्या मागणी बाबत लेखी आश्वासन येईपर्यंत आपले उपोषण सुरूच राहील, असे त्यांनी जाहीर केले. यावेळी उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी दीपक रणनवरे यांच्या उपोषणा संदर्भातील मागणीबाबत आपण शासनास कळविले असल्याचे सांगून याबाबत शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल असे सांगितले, प्रकृतीकडे लक्ष देत रणनवरे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे, अशी विनंतीही त्यांनी केली.

यावेळी योगेश जांतीकर, सिध्दीविनायक मुळे, आर. आर. जोशी, दिलीप जोशी, विलास कुलकर्णी, रविंद्र देशपांडे, सुनील देशपांडे, संजय देशपांडे, प्रसाद पाटील, किशोर मुळे, मधुसूदन दंडारे, अरविंद देशपांडे, ज्योती जोशी , महसूल व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, आज सहाव्या दिवशी शहरातील व परगावच्या सामाजिक संघटनेच्या मंडळींनी दीपक रणनवरे यांची भेट घेऊन त्यांना आपला पाठिंबा जाहीर केला. यात अरविंद देशमुख, अशोक पडूळ,शुभम टेकाळे,विशाखा नाईक, राजेश दायमा, सतीश कुलकर्णी, शरद जोशी, मनोज आचार्य, सिध्दार्थ कुलकर्णी, प्रदीप राखे, सुधीर आंबेकर, विठ्ठल कुलकर्णी, गोविंद सातोनकर,संदीप जोशी, विवेक भाले, दिलीप सराफ, अनिकेत जोशी, गोपाल कुलकर्णी, तुषार जहागीरदार, संतोष बोर्डे, मुरलीधर देशमुख, वैभव जामवाडीकर, शाम डंख, धनंजय जेवरीकर, हेमंत कुलकर्णी आदींचा समावेश होता.

### लोणीकर पिता...

अनुभव असल्यामुळे ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांच्या नियुक्तीचा पक्ष वाढीसाठी निश्चितच फायदा होणार असल्याचा विश्वास आमदार बबनरावजी लोणीकर व राहुल भैया लोणीकर यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्ती बद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाअध्यक्ष श्री रवींद्र दादा चव्हाण, देशाचे माजी रेल्वे राज्यमंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे, राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर, राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे, भाजपा किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री रामकृष्णजी वेताळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रभारी माजी मंत्री तथा जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री संजयजी कुटे, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायणराव कुचे, भोकरदन चे आमदार संतोष पाटील दानवे, माजी आमदार कैलास शेठ गोरंट्याल, माजी आमदार विलास बापु खरात, घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील विधानसभा प्रमुख तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाडगे पाटील, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, यांच्यासह राज्यातील भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि अनेक कार्यकर्त्यांनी ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांचे अभिनंदन केले आहे. आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.

ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांनी भारतीय जनता पार्टीच्या सर्व सेल ,आघाड्यांच्या आणि प्रकोष्टच्या वरिष्ठ नेतेमंडळी आणि मित्रमंडळीचे मनापासून आभार मानले आहे.

### जगातील सर्वात...

कैलास झोळगे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, जालना जिल्हा जलतरण संघटना, विविध सामाजिक संस्था तसेच नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे जालना जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळाली असून जिल्ह्यातील युवा जलतरणपटूंना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

# BSNL च्या भूमिगत केबलची चोरी करणाऱ्या परजिल्ह्यातील दोघांना अटक

## चंदनझिरा पोलिसांची कारवाई; ९ लाखांची केबल, १४ लाखांची दोन वाहने व कुऱ्हाडी असा २३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरालगतच्या नागेवाडी शिवारात खोदकाम करून भारत संचार निगम लिमिटेड ()ची भूमिगत टेलिफोन केबल चोरणाऱ्या परजिल्ह्यातील दोन चोरट्यांना चंदनझिरा पोलिसांनी परभणी जिल्ह्यात जाऊन ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ९ लाख रुपये किमतीची चोरीची केबल, चोरीसाठी वापरलेली १४ लाख रुपये किमतीची दोन पिकअप वाहने आणि केबलचे तुकडे करण्यासाठी वापरलेल्या दोन कुऱ्हाडी, असा एकूण २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे भूमिगत केबल चोरीचे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर नागेवाडी शिवारातील काकडे पेट्रोल पंपाजवळ कंपनीची टेलिफोन सेवा देणारी भूमिगत केबल टाकण्यात आलेली आहे. अज्ञात चोरट्यांनी या केबलचे खोदकाम करून सुमारे ३०० मीटर केबल वायर चोरी केली होती. ही घटना २८ ऑगस्ट २०२६ रोजी उघडकीस आली.

घटनेनंतर च्या अधिकाऱ्यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्यात धाव घेत चोरीची तक्रार दाखल केली. भूमिगत केबल खोदून काढण्यात आल्याने चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेणे पोलिसांसमोर आव्हान होते. घटनास्थळी चोरट्यांबाबत ठोस माहिती उपलब्ध नसल्याने पोलिसांनी तांत्रिक तपासासह गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय केले.

गुन्ह्याचा तपास करताना चंदनझिरा पोलिसांनी विविध तांत्रिक बाबी तपासण्यास सुरुवात केली. त्याचवेळी गोपनीय बातमीदारांकडून माहिती संकलित करण्यात आली. चोरी केलेली केबल दोन पिकअप वाहनांमधून परभणीच्या दिशेने नेण्यात येत असून ती विक्री करण्याच्या तयारीत असल्याची महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची तत्काळ खातरजमा करून चंदनझिरा पोलिसांनी परभणी पोलिसांशी संपर्क साधला. संभाव्य मार्गांवर नाकाबंदी करण्याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर परभणी पोलिसांनीही तत्परता दाखवत संशयित वाहनांचा शोध सुरू केला. नाकाबंदी दरम्यान परभणी जिल्ह्यातील दैठणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोखर्णी गावाजवळ दोन पिकअप वाहने संशयास्पदरीत्या जाताना आढळून आली. या वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये कुऱ्हाडीने तुकडे केलेले केबल वायरचे मोठ्या प्रमाणात तुकडे आढळून आले. परभणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन्ही पिकअप वाहने ताब्यात घेतली. त्यानंतर चंदनझिरा पोलिसांचे पथक तातडीने दैठणा पोलीस



ठाण्यात दाखल झाले. वाहनांमधील केबल, इतर साहित्य आणि संशयितांची चौकशी करण्यात आली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे बाबुराव आण्णासाहेब शिंदे (वय २६) आणि दिलीप आण्णासाहेब शिंदे (वय २०), दोघेही रा. कोटंबवाडी, पोस्ट पोखर्णी, ता. जि. परभणी अशी आहेत.

प्राथमिक चौकशीत आरोपींनी नागेवाडी शिवारातील ची भूमिगत केबल चोरी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच आपल्या साथीदारांसह यापूर्वीही केबल वायरची चोरी करून ती छत्रपती संभाजीनगर येथे विक्री केल्याचे त्यांनी सांगितल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे या टोळीने यापूर्वी अशा प्रकारच्या आणखी किती चोऱ्या केल्या आहेत, याचा तपास आता पोलिसांकडून करण्यात येत आहे.

या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ९ लाख रुपये किमतीची केबल वायर, चोरीसाठी वापरलेली १४ लाख रुपये किमतीची दोन पिकअप वाहने तसेच केबलचे तुकडे करण्यासाठी वापरलेल्या दोन कुऱ्हाडी असा सुमारे २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

विशेष म्हणजे, भूमिगत केबल चोरी करण्यासाठी चोरट्यांनी खोदकाम करून ती बाहेर काढली आणि त्यानंतर विक्रीच्या उद्देशाने तिचे लहान तुकडे केल्याचे तपासातून समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच चोरीची केबल नेमकी कुठे आणि कोणाला विकली जाणार होती, याचाही तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

परजिल्ह्यातील टोळीवर पोलिसांचा संशय

चोरीनंतर केबल परभणीच्या दिशेने नेण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर चंदनझिरा पोलिसांनी परभणी पोलिसांच्या मदतीने केलेली कारवाई महत्त्वाची ठरली. या प्रकरणातील आरोपी परभणी जिल्ह्यातील रहिवासी असल्याने केबल चोरीमध्ये परजिल्ह्यातील टोळी सक्रिय असल्याचा संशय अधिक बळावला आहे. आरोपींनी यापूर्वीही साथीदारांच्या मदतीने केबल चोरी करून छत्रपती संभाजीनगर येथे विक्री केल्याची माहिती दिल्याने या टोळीच्या मागील गुन्ह्यांचा तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. चोरीची केबल खरेदी करणारे व्यक्ती किंवा भंगार व्यावसायिक यांचा सहभाग आहे का, याचीही चौकशी होण्याची शक्यता आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

केबल चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक मारीयो स्कॉट, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत देशमुख, राजेंद्र पवार आणि पोलीस कॉन्स्टेबल सागर खैरे यांच्या पथकाने तांत्रिक तपास, गोपनीय माहिती आणि परभणी पोलिसांच्या समन्वयातून ही कारवाई यशस्वी केली. भूमिगत दूरसंचार केबल चोरीसारख्या तांत्रिक स्वरूपाच्या गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावत चंदनझिरा पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे. आता या प्रकरणामागील संपूर्ण टोळी, यापूर्वीच्या केबल चोरीच्या घटना आणि चोरीचा माल खरेदी-विक्री करणाऱ्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपासाला वेग येण्याची शक्यता आहे.

# जगातील सर्वात लांब पल्ल्याच्या जलतरण स्पर्धेसाठी कैलास झोळगे यांची निवड

### *भागीरथी नदीच्या ८१ किमी पात्रात रोवणार विजयाची पताका*

**जालना - प्रतिनीधी**

जगातील सर्वाधिक खडतर आणि आव्हानात्मक मानल्या जाणाऱ्या पश्चिम बंगाल मधील भागीरथी नदी येथे होणाऱ्या ८१ किलोमीटर राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी जालन्याचे अष्टपैलू खेळाडू आयर्न मॅन कैलास झोळगे यांची निवड झाली आहे.



पश्चिम बंगाल येथे येत्या ६ सप्टेंबर २०२६ रोजी जागतिक पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या एकमेव सर्वात लांब अंतराची स्पर्धा संपन्न होणार आहे. स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया व मुर्शिदाबाद (पश्चिम बंगाल) स्विमिंग यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या मुर्शिदाबाद येथील एरन बार्रेज घाट जागीपूर ते गोरबाजार सदर घाट बहरामपूर असे ८१ किमी भागीरथी नदीच्या विस्तीर्ण पात्रात ही जागतिक स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.वेगवान पाण्याचा प्रवाह व विस्तीर्ण पात्र आणि तब्बल ८१ किलोमीटरचे अंतर अशा अत्यंत कठीण परिस्थितीत सलग पोहण्याचे आव्हान व शारीरिक कसोटीची परीक्षा होणार असून स्पर्धेत सहभागी जलतरणपटूंना कस लागणार आहे.''मिशन भागीरथी ८१'' या स्पर्धेसाठी कैलास झोळगे यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर सराव, शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक तयारीवर विशेष भर दिला आहे. राष्ट्रीय तसेच खुल्या पाण्यातील विविध स्पर्धांमधील त्यांच्या सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे त्यांची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

निवडीबाबत प्रतिक्रिया देताना कैलास झोळगे म्हणाले, ''भागीरथी नदीतील ८१ किलोमीटरची ही स्पर्धा जगातील सर्वात आव्हानात्मक स्पर्धांपैकी एक मानली जाते. अशा ऐतिहासिक स्पर्धेत जालना जिल्ह्याचे (महाराष्ट्र राज्याचे) प्रतिनिधित्व करण्याची.

संधी मिळणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.मी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या पूर्ण तयारी केली असून दररोज पाच ते सात तास पोहण्याचा व स्ट्रेंथ ट्रेनिंगचा सराव केला आहे. त्यामुळे उत्कृष्ट कामगिरी करून पदक मिळवणे हेच माझे ध्येय आहे.

*(पान ३ वर)*

# ग्रामपंचायतींच्या अधिकारांची गळचेपी सहन करणार नाही!

## नाव्हा उपसरपंचांचा जिल्हा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर विकासकामांची माहिती संबंधित ग्रामपंचायतींना न देणे, ग्रामपंचायतींच्या वैधानिक अधिकारांची गळचेपी करणे आणि मंजूर कामे प्रलंबित ठेवून त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थांकडे वळवण्याच्या प्रकाराविरोधात नाव्हा ग्रामपंचायतीच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला सविस्तर निवेदन व कायदेशीर पूर्वसूचना देण्यात आली असून, येत्या ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत ठोस कार्यवाही न झाल्यास ८ सप्टेंबर २०२६ पासून जिल्हा परिषद, जालना कार्यालयासमोर बेमुदत (आमरण) उपोषण आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

काय आहे प्रकरण?

नाव्हा ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा वार्षिक योजनांतर्गत विविध ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात विकासकामे मंजूर करण्यात आली असून त्यांना प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे. मात्र, ही प्रक्रिया करताना संबंधित ग्रामपंचायतींना पूर्णपणे अंधारात ठेवण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यतांचे आदेश अस्तित्वात असतानाही ग्रामपंचायत कार्यालयास अधिकृत माहिती किंवा प्रती उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

ग्रामपंचायतींच्या वैधानिक अधिकारांवर गदा भारतीय संविधानातील भाग ९ आणि अनुच्छेद २४३ (जी) तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ४५ अन्वये ग्रामपंचायतींना विकासकामांचे अधिकार प्राप्त आहेत. असे असतानाही स्थानिक स्वराज्य संस्थांना विश्वासात न घेता परस्पर कामे त्रयस्थांकडे वळवणे अत्यंत चुकीचे व प्रशासकीय उदासीनतेचे लक्षण असल्याचे निवेदनात म्हटले आहे. आर्थिक व्यवहारांच्या संशयावरून चौकशीची मागणी

मंजूर कामे अनेक महिने प्रलंबित ठेवून त्रयस्थ व्यक्ती किंवा संभाव्य ठेकेदारांना देण्यामागे काही आर्थिक व्यवहारांचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्रत्यक्ष काम न करता निधीची उचल झाली आहे का, याची अभिलेखाधारित तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच काही अधिकारी पालकमंत्र्यांच्या नावाचा गैरवापर करून असे प्रकार करत आहेत का, याचीही चौकशी होऊन पालकमंत्र्यांची होणारी बदनामी टाळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आंदोलनाचा एल्गार

येत्या ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत सर्व मंजूर कामांची माहिती, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया आणि सद्यस्थिती ग्रामपंचायतीला जाहीर न केल्यास, ८ सप्टेंबर २०२६ पासून ग्रामपंचायत नाव्हाच्या वतीने सरपंच, उपसरपंच व

*(पान ३ वर)*

# राहुल गांधींसोबतची भेट ठरली अविस्मरणीय

### डॉ. विशाल धानुरे यांना समाजहितासाठी नव्या जोमाने कार्य करण्याची प्रेरणा

**जालना - प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाच्या संघटन सृजन अभियान अंतर्गत नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरादरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची परिवारासह भेट घेण्याचा सन्मान काँग्रेसचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांना लाभला. या भेटीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, डॉ. धानुरे यांनी हा क्षण



आपल्या राजकीय व सामाजिक जीवनातील संस्मरणीय क्षण असल्याचे सांगितले.

प्रशिक्षण शिबिराच्या निमित्ताने राहुल गांधी यांच्यासोबत झालेल्या संवादात देशातील वर्तमान परिस्थिती, लोकशाही मूल्ये, संविधानाचे संरक्षण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत विचारांची देवाणघेवाण

*(पान ३ वर)*

# जालना – परभणी महामार्गावर केंधळी येथे मराठा समाजाचा चक्का जाम; आंदोलक मोबाईल टॉवरवर

**जालना - प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मराठा समाजाच्या आंदोलकांनी जालनापरभणी महामार्गावर आक्रमक पवित्रा घेत केंधळी येथे चक्का जाम आंदोलन सुरू केले आहे. गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास सुरू झालेल्या या आंदोलनामुळे जालनापरभणी महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून, महामार्गावर



वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मनोज जरांगे हे मागील सहा दिवसांपासून आमरण उपोषण करत असून, त्यांच्या मागण्यांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी मराठा समाजाच्या आंदोलकांकडून करण्यात येत आहे. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी केंधळी येथे अचानक मोठ्या संख्येने आंदोलक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी महामार्ग रोखून धरला. आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या देत रास्ता रोको केल्याने दोन्ही बाजूंनी ये-जा करणारी वाहने जागच्या जागी थांबली. गेल्या सुमारे दोन तासांपासून वाहतूक ठप्प असल्याने प्रवासी, एसटी बस, मालवाहतूक करणारी वाहने तसेच खासगी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महामार्गावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्याने वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. आंदोलनामुळे नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांचे वेळापत्रकही कोलमडले आहे. दरम्यान, आंदोलनाला अधिक आक्रमक वळण मिळाले असून, काही मराठा आंदोलक मोबाईल टॉवरवर चढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आंदोलनस्थळी प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण

*(पान ३ वर)*

# लोणीकर पिता-पुत्राकडून ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांचा सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

भाजपा किसान मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे त्यानिमित्त महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा आणि स्वच्छता खात्याची माजी मंत्री तथा जालना जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री बबनराव लोणीकर आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव, परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री राहुलभैया लोणीकर यांच्या हस्ते श्री ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्री ज्ञानेश्वर शेजुळ यांनी यापूर्वी तीन वेळा भाजपा चे जालना जिल्हा उपाध्यक्ष म्हणून तसेच तीन वेळा भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हा अध्यक्ष



म्हणून आणि दोन वेळा भाजपाचे जालना तालुका अध्यक्ष म्हणून व एक वेळेस जालना विधानसभा मतदारसंघाच्या रोजगार हमी योजनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी पार पडली आहे. श्री ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सेवली भागातील अनेक गावाचा विकासाच्या माध्यमातून कायापालट केलेला आहे. श्री ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांना पक्ष संघटनेचा तसेच प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ

*(पान ३ वर)*

# दीपक रणनवरे यांच्या उपोषणाबाबत जिल्हा प्रशासनाला आली जाग

## उपविभागीय अधिकाऱ्यांनी घेतली उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांची भेट

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरात सुरू असलेल्या सामाजिक कार्यकर्ते दीपक रणनवरे यांच्या उपोषणाबाबत जिल्हा प्रशासनास जाग आली असून उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी आज दीपक रणनवरे यांची भेट घेऊन त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. दरम्यान, शासनाकडून मागण्यांबाबतचे लेखी आश्वासन




मिळाल्याशिवाय आपण माघार घेणार नसल्याचा निर्धार रणनवरे यांनी केला आहे. ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते दीपक रणनवरे यांनी २९ ऑगस्ट पासून जालना शहरातील गांधी चमन येथे अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या सहाव्या दिवशी उपोषणासंदर्भात जिल्हा प्रशासनाने हालचाली सुरू केल्या. उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार धैर्यशील गवळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आदींनी उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांची भेट घेतली. यावेळी त्यांना समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. यावेळी बोलतांना दीपक रणनवरे

*(पान ३ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.